महाराष्ट्र शासन
वनविभाग
उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली यांचे कार्यालय.
पोटेगांव रोड, तह. जिल्हा गडचिरोली. पिन 442 605 (म.रा.)
फोन नं. ०७१३२/२३२०३६ E-mail : dycfgadchiroli@mahaforest.gov.in

# जाहिरात

**गडचिरोली वनविभाग, गडचिरोली अंतर्गत खालील कंत्राटी पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदाची संख्या | मानधन | मुख्यालय | कालावधी | अतिरिक्त पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Veterinary Doctor (पशुवैद्यकिय अधिकारी) | 01 | 50,000/- | गडचिरोली | 11 महिने | वन्यप्राण्यांचे उपचार व हाताळण्याचा अनुभव.पशुवैद्यकिय शास्त्राच्या क्षेत्रातील किमान 3 वर्षाचा व्यावहारीक अनुभव |

**शैक्षणिक पात्रता**

१. **Veterinary Doctor:-** पदवी B.V.Sc. उमेदवारास वनविभागाध्ये किंवा इतर शासकिय-निमशासकिय अशासकिय संस्थेमध्ये प्राधिकरणाअंतर्गत किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

टिप :-

१) वयोमर्यादा :- २५ ते ३५ वर्ष (दि.०१/०१/२०२३ रोजी) (शारिरिक स्वास्थ सुदृढ)
२) सर्व पदांना मराठीचे पुरेसे ज्ञान (वाचन, लिहीणे, बोलणे)आवश्यक आहे.
३) वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या मुख्यलया व्यतिरिक्त निवड झालेल्या उमेदवारास उपवनसंरक्षक(प्रा)गडचिरोली वनविभाग,गडचिरोली यांचे आदेशानुसार त्यांचे कार्यक्षेत्रातील व इतर कोणत्याही ठिकाणी काम करावे लागेल.
४) उपवनसंरक्षक (प्रा)गडचिरोली वनविभाग,गडचिरोली पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) मधील पदाकरिता आवेदन ई मेल वर सादर करतेवेळी फक्त आपला बायोडाटा (Resume) व अर्ज (Application) या कार्यालयाचे ई मेल- dycfgadchiroli2014@gmail.Com वर सादर करावे. वरीलप्रमाणे दर्शविलेला शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता याबाबतचे दस्ताऐवज मुलाखतीचे वेळेस दाखविण्यात यावे. याबाबत नोंद घ्यावी. कोणतेही इतर कागदपत्रे अर्जासोबत जोडू नये.
५) उमेदवार हा कोणत्याही इतर शासकिय, निमशासकिय, अशासकिय संस्था किंवा संघटना यांचा पदाधिकारी असता कामा नये.
६) सदर पदे ही पुर्ण वेळ असल्याने या काळात उमेदवाराला इतरत्र काम/प्रॅक्टीस करता येणार नाही.
७) सदर पदांचे मुख्यालय गडचिरोली राहणे बंधनकारक असेल.
८) वरील सर्व पदाबांबत संगणकाचे पुरेसे ज्ञान अत्यावश्यक/आवश्यक आहे.
९) वैयक्तिक मुलाखतीसाठी केवळ प्राथमिक निवड (Short Listing) झालेल्या उमेदवारांना बोलविण्यात येईल. मुलाखतीकरिता येणा-या उमेदवारांना कोणताही भत्ता (TA/DA) लागु राहणार नाही. मुलाखतीची तारीख व वेळ Short Listing झालेल्या उमेदवारांना वेगळयाने कळविण्यांत येईल.

(मिलिश दत्त शर्मा,भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
गडचिरोली वनविभाग,
गडचिरोली.

**प्रत:-** कक्ष प्रमुख-आस्थापना/योजना-ब यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहीतीस रवाना.

महाराष्ट्र शासन
वनविभाग
उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली यांचे कार्यालय.
पोटेगांव रोड, तह. जिल्हा गडचिरोली. पिन 442 605 (म.रा.)
फोन नं. ०७१३२/२३२०३६ E-mail : dycfgadchiroli@mahaforest.gov.in

गडचिरोली वनविभाग, गडचिरोली यांचे कार्यक्षेत्रात मानव- वन्यजीव संघर्ष टाळणे, जखमी वाघ-बिबट व इतर प्रजातीचे पशुपक्षांचे उपचार करणे, वन्यप्राण्यांचा अभ्यास करणेकरीता कंत्राटी पध्दतीवर प्रशिक्षीत Veterinary Doctor यांची नियुक्ती करणेबाबत.

जाहिरात प्रकाशित क्रमांक कक्ष-२(९)/२५-भांडार/२०२२-२३/ 2042 दिनांक, गडचिरोली 29.12.2022

गडचिरोली वनविभाग, गडचिरोली यांचे कार्यक्षेत्रात मानव- वन्यजीव संघर्ष टाळणे, जखमी वाघ-बिबट व इतर प्रजातीचे पशुपक्षांचे उपचार करणे, वन्यप्राण्यांचा अभ्यास करणेकरीता कंत्राटी पध्दतीवर प्रशिक्षीत Veterinary Doctor यांची नियुक्ती करावयाची आहे. भरतीसाठी ईच्छुक उमेदवारांनी सोबतच्या विहीत नमुन्यातील आपला अर्ज व्यवहाराकरीता नमुद पुढील पत्यावर दिनांक १६/०१/२०२३ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावा.

**पदाचे नाव :- पशुवैद्यकिय अधिकारी**

१) **मानधन:-** प्रति महा रुपये ५०,०००/-

२) **शैक्षणिक पात्रता:-** पशुवैद्यकिय विज्ञान विषयात पदवी तसेच शासकिय/अर्धशासकिय विभागात/अशासकिय संस्थेत संबधित विषयाचे काम केल्याचा कमीत की ३ वर्षाचा अनुभव, वन्यजीव विभागात कामाचे अनुभव असलेल्या किंवा वन्यजीव व्यवस्थापानात भारतीय वन्यजीव संस्थान, देहरादुन मधुन प्रमाणपत्र किंवा पदविका प्राप्त उमेदवारांना प्रथम प्राधान्य राहील.

३) **वयोमर्यादा:-** २५ ते ३५ वर्ष (शारिरीक स्वास्थ सुदृढ) (दिनांक ०१ /०१/२०२३ रोजी)

४) **निवडीची पध्दत:-** उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते विहित शैक्षणिक पात्रताचे पुर्तता करतात किंवा कसे याची श्हानिशा करण्यात येईल व तद्नंतर मौखिक परिक्षेव्दारे अंतिम निवड होईल.

५) **उमेदवारांची नियुक्ती पुर्वी ठेवावयाची सुरक्षा ठेव व करारपत्र :-** उमेदवारांचे शासकिय व्यवहाराची जबाबदारी असल्याने नेमणुक देण्यापुर्वी उमेदवारांकडून रु.५०००/- इतकी सुरक्षा ठेव घेण्यात येईल तसेच रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर उपवनसंरक्षक (प्रा.)गडचिरोली वनविभाग,गडचिरोली यांचे नावे सोबत जोडलेल्या परिशिष्ट-२ मधील विहित नमुन्यात करारपत्र घेण्यात येईल.

६) **नियुक्ती कालावधी :-** करार पध्दतीने ११ महिण्याचा कालावधीसाठी करण्यात येईल.११ महिण्यानंतर नेमणूक आपोआप संपुष्टात येईल. करार पध्दतीचा कालावधीत त्यांची कामगिरी समाधानकारक असेल त्यांना पुध्हा ११ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने (On Contract Basis) नेमध्यात येईल. काम समाधानकारक नसेल तर त्यांची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता केव्हांही समाप्त करण्यांत येईल.

७) **पुन:र्नियुक्ती:-** करार पध्दतीतील पशु वैद्यकिय अधिका-यांचे काम समाधानकारक असल्याबाबत उपवनसंरक्षक (प्रा) गडचिरोली वनविभाग,गडचिरोली यांची खात्री पटल्यानंतर पुढील ११ महिण्यासाठी पुन:र्नियुक्ती देण्यात येईल. त्याबरोबर नविन करारपत्र घेवून त्यांना नविन नियुक्ती देण्यात येईल. त्यासाठी त्यांना नविन निवड प्रक्रीयेतून जाण्याची आवश्यकता नाही. सुरक्षा ठेव प्रथ नियुक्तीच्या वेळेस घेतल्याने पुन्हा सुरक्षा ठेव घेण्यात येणार नाही.

८) **निवडीची कार्यपध्दत**

अ) **अर्ज शुल्क रू. ५०/- :-** उमेदवारांनी ५०/- रूपये रोख भरून विहित अर्ज या कार्यालयातून प्रत्यक्ष येवून प्राप्त करावा. भरलेला अर्ज व्यक्तीगत येवून या कार्यालयास सादर करावा.भरलेला अर्ज शिलबंद पाकीटात संबधीत कर्मचा-यांना सादर करून पोचपावती प्राप्त करावी.

ब) उपवनसंरक्षक (प्रा)गडचिरोली वनविभाग, गडचिरोली यांचे नावाचे रु.१००/- चा धनाकर्ष (डी.डी.) अर्जासोबत सादर करावा.

क) पदासाठी प्राप्त अर्जातुन प्राप्त उमेदवारांना मुलसखतीसाठी बोलविण्यात येईल.

ड) मुलाखत १०० गुणांची राहील. उमेदवारांचा अनुभव, पदवी परिक्षेतील प्राप्त गुण, वन्यजीव विभागात अनुभव व मुलाखतीचे गुण एकत्रित विचारात घूवन उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार करण्यांत येवून यादी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येईल.

९) समितीने निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी १ वर्षापर्यंत ग्राहय राहील.

१०) कंत्राट पध्दतीने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना गडचिरोली वनवृत्ताचे कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी काम करावे लागेल.

११) संबधीत उमेदवारास करारपत्रातून मुक्त व्हायचे असल्यास नियुक्ती प्राधिका-याला १ महिण्याचे पुर्वी सुचना देणे आवश्यक राहील. उमेदवाराने अशी सुचना न देता मानधन तत्वावरील नेमणुक सोडल्यास १ महिण्याच्या मानधनाएवढी रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करून उमेदवारास सेवा मुक्त होता येईल. जर शासनाने इतर विभागाकडून प्रतिनियुक्तीचे पद भरल्यास करार पध्दतीने भरलेल्या उमेदवाराची सेवा आपोआप संपूष्टात येईल.

१२) सदर नेमणुक ही पुर्णतः कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे या नेमणुकीव्दारे कर्मचा-यास कुठल्याही सेवा विषयक लाभाचा हक्क राहणार नाही. सेवेत स्थापित्य नविन नेमणुकीचा हक्क, रजा नुकसान भरपाई, वैद्यकिय प्रतिपुर्ती इत्यादी सवलती अनुज्ञेय राहणार नाही.

१३) सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची राहील.

१४) उमेदवारास संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे. (MS-CIT) परिक्षा उर्त्तीर्ण असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

१५) अर्ज प्राप्त करावयाचा पत्ता :-

उपवनसंरक्षक (प्रा)गडचिरोली वनविभाग, गडचिरोली, पोटेगाव रोड,ता.जि.-गडचिरोली -४४२६०५

१६) <u>निवड प्रक्रियेचे वेळापत्रक</u>

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज विकण्याची अंतिम तारीख (किंमत रू.५०/- रोख) | १६-०१-२०२३ (सोमवार) |
| २ | भरलेले अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख | २०-०१-२०२३ (शुक्रवार) |
| ३ | अर्जाची छाननी करणे. | २४-०१-२०२३ (मंगळवार) |
| ४ | पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्याचे पत्र पाठविणे. | ३०-०१-२०२३ (सोमवार) |
| ५ | पात्र उमेदवारांची मुलाखत | ०८-०२-२०२३ (बुधवार) |
| ६ | पात्र उमेदवारांची अंति नियुक्ती यादी जाहीर करणे. | १५-०२-२०२३ (बुधवार) |

**(मिलिश दत्त शर्मा,भा.व.से.)**
**उप वनसंरक्षक,**
**गडचिरोली वनविभाग,**
**गडचिरोली.**

**प्रत:-** कक्ष प्रमुख-आस्थापना/योजना-ब यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहीतीस रवाना.

D:\SANTOSH\TENDER MANUALLY-2022-23\Tender No.05 Veterinary Officer\Advertisment.docx